Sakal 23-12-21 PS Coop

# सहकार क्षेत्राला स्वायत्तता द्यावी : अनास्कर

## सहकारी बँकिंगसमोरील प्रश्न सोडविण्याचे अमित शहा यांचे आश्वासन

**पुणे, ता. २२ :** "रिझर्व्ह बँकेने सध्या सहकारी बँकांबाबत स्वीकारलेले धोरण सहकाराला मारक असून, त्यासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र उपाययोजना कराव्यात. सहकाराच्या मूळ तत्त्वांनुसार सहकाराला संपूर्ण स्वायत्तता देणाऱ्या कायद्यांची निर्मिती करावी," अशी मागणी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) विद्याधर अनास्कर यांनी केली. त्यावर केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी सहकारी बँकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

अमित शहा, विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत नगर येथे सहकार परिषद नुकतीच पार पडली. या वेळी अनास्कर यांनी 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे ऑक्टोबरमध्ये सहकार महापरिषदेत मांडलेल्या सहकारी बँकिंग आणि पतसंस्थांच्या मुद्यांबाबत शहा यांचे लक्ष वेधले.

अनास्कर म्हणाले, "मुक्त अर्थव्यवस्थेत खासगी क्षेत्रासह सहकार क्षेत्रालाही समान संधी मिळावी, यासाठी ३० वर्षांत अनेक प्रयत्न झाले, अनेक समित्या स्थापन झाल्या. बहुचर्चित ९७ वी घटना दुरुस्तीसह अनेक दुरुस्त्या सुचविल्या. परंतु देशपातळीवर त्यात यश आले नाही. राष्ट्रीय धोरणामध्ये सहकार चळवळीबाबत विभागीय असमतोल कमी करणे, प्रशिक्षण, व्यावसायिकता या उद्दिष्टांबाबत प्रयत्न होत नाही.

राज्यघटनेमध्ये सहकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा असूनही २००२ पासून रिझर्व्ह बँकेने एकाही सहकारी बँकेसाठी बँकिंग परवाना दिलेला नाही. सहकारी बँकांचे रूपांतर व्यापारी बँकांमध्ये करण्यास रिझर्व्ह बँक प्रयत्नशील आहे. हा प्रकार म्हणजे एखाद्या नागरिकाचे सक्तीने धर्मांतर करण्यासारखे आहे."

### अनास्कर यांच्या भाषणातील मुद्दे

- सहकार टिकविण्यासाठी विद्यार्थी, युवकांचा सहभाग वाढवावा
- पतसंस्थांना मल्टिस्टेट सोसायट्यांप्रमाणे व्यवसायात समान संधी द्यावी
- सहकारातील गुंतवणूक वाढविण्यासाठी रिझर्व्ह फंडातून सभासदांच्या भांडवलात वृद्धी करावी
- सहकारी बँकिंग, हाउसिंग, साखर आणि डेअरीसाठी स्वतंत्र कायदे असावेत
- सहकारी संस्थांच्या संचालकांना नफ्यातील ५ ते १० टक्क्यांपर्यंत हिस्सा द्यावा
- पुण्यात सहकार विद्यापीठाची स्थापना करावी



### काय म्हणाले अमित शहा ...



अमित शहा

अनास्कर यांनी आत्मीयतेने सहकार क्षेत्राबाबत समस्या मांडल्या. केंद्र सरकारकडून सहकारी बँकांना वाचविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात येतील. सहकारासाठी अनेक समित्या स्थापन झाल्या. त्यांचे अहवालही आले, परंतु अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे यापुढे एकही समिती गठित करण्यात येणार नाही. अनास्कर यांच्यासारख्या सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत बसून त्यावर मार्ग काढण्यात येईल.

### देवेंद्र फडणवीस म्हणाले...

अनास्कर यांनी मांडलेले मुद्दे योग्य आहेत. आजपर्यंत रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना विचारत नव्हती. परंतु सहकारी बँकांना अमित शहा यांच्यासारखा नेता लाभला आहे. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. रिझर्व्ह बँकेला आता सहकारी बँकेचे म्हणणे ऐकावे लागेल आणि त्यांना आवश्यक ती मदत करावी लागेल.